epaper.lokmat.com

लोकमत संमिश्र

# जर्मनीतल्या 'अरिहा'साठी धावला राज्य महिला आयोग!

कुंदन पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जर्मनीतील प्रशासनाच्या कुंपणात अडकलेली भारतीय तान्हुली अरिहाच्या मदतीसाठी राज्य महिला आयोगाने परराष्ट्र मंत्रालयाकडे धाव घेतली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी शुक्रवारी केंद्रीय परराष्ट्र मंत्रालयाला पत्र पाठविले असून अरिहा व तिच्या कुटुंबीयांवरील अन्यायाची तत्काळ दखल घेण्याची मागणी केली.

मुंबईतील भावेश व धारा (अहमदाबाद) हे दाम्पत्य जर्मनीतील बर्लिन शहरात वास्तव्याला आहे. फेब्रुवारी २०२१ मध्ये शहा यांच्या घरी लेक जन्मली. तिच्या नाजूक जागी जखम झाल्याचे लक्षात येताच संवेदनशीलपणाचा आव आणत अरिहाला पोलिसांपाठोपाठ 'जर्मन चाईल्ड केअर सेंटर'च्या पथकाने ताब्यात घेतले. अरिहा जैन परिवारातील असतानाही तिला मांसाहार पुरविला जात असल्याचा आरोप तिच्या पालकांनी केला आहे. 'लोकमत'ने शहा दाम्पत्याच्या या दुःखाला वाचा फोडली. याची दखल घेत राज्य महिला आयोगाच्या वतीने सदस्य सचिव श्रद्धा जोशी यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी पत्रव्यवहार केला आहे.

## लोकमत इम्पॅक्ट रूपाली चाकणकरांनी मागितली परराष्ट्र मंत्रालयाकडे दाद

अरिहाच्या मदतीसाठी आपण स्वत: वैयक्तिक लक्ष घालणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाकडे सातत्याने पाठपुरावा करू आणि भारतीय लेकीला सुखरूपपणे तिच्या पालकांच्या स्वाधीन करू, असा विश्वास आहे.

- रूपाली चाकणकर, अध्यक्षा, राज्य महिला आयोग

### रक्षा खडसेही सरसावल्या

शहा परिवाराच्या मदतीसाठी खासदार रक्षा खडसेही सरसावल्या आहेत. अरिहाची आई धारा हिच्याशी आपले सविस्तर बोलणे झाले आहे. धाराच्या व्यथा ऐकून आपणही व्यथित झालो आहोत. यासंदर्भात परराष्ट्र मंत्र्यांकडे पाठपुरावा सुरू असल्याचे खडसे यांनी सांगितले.



'लोकमत'ने शहा दाम्पत्याच्या दुःखाला वाचा फोडली. याची दखल घेत राज्य महिला आयोगाच्या वतीने सदस्य सचिव श्रद्धा जोशी यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी पत्रव्यवहार केला आहे.

30/7/22 लोकमत